पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/१०/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **०३/१०/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
३. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
४. मा.चोंधे आरती सुरेश
५. मा.कुटे निर्मला संजय
६. मा.वैशाली जालिंदर काळभोर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.हिराबाई(नानी) घुले अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

मा.महिला व बालकल्याण समितीची (कार्यपत्रिका क्रमांक १०) दिनांक ०३/१०/२०१८ ची पाक्षीक सभा शुक्रवार दिनांक ०५/१०/२०१८ रोजी दु.३.००वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** शुक्रवार दि.०५/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १०

**सभावृत्तांत**

( दिनांक ०३/१०/२०१८ ची तहकूब सभा )

दिनांक - **०५/१०/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक ०३/१०/२०१८ रोजीची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **०५/१०/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मुंढे उषा अंकुश**

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सभाकामकाज सुरु करते वेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने उपस्थित सन्मा. सदस्या यांनी सदरची सभा शनिवार दिनांक ०६/१०/२०१८ दुपारी २.०० वा. सभा तहकूब केली.

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १०

**सभावृत्तांत**

( दिनांक ०३/१०/२०१८ व ०५/१०/२०१८ ची तहकूब सभा )

दिनांक - **०६/१०/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक ०५/१०/२०१८ ची तहकूब सभा **शनिवार** दिनांक **०६/१०/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
३. मा.चौंधे आरती सुरेश
४. मा.कुटे निर्मला संजय

या शिवाय मा.झगडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) शहरातील महिला वर्गासाठी विशेषत: गृहीणींसाठी तसेच नोकरदार महिला, बचत गटातील महिलांसाठी योग वर्ग सुरु करणेबाबत. – मा.उषा मुंढे , मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) अंध जेष्ठ नागरिकांसोबत असणा-या एका व्यक्तिस PMPML चा मोफत पास देणे बाबत.- मा.उषा मुंढे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव

----------

दिनांक १८/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ०९ ) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०६/१०/२०१८

सुचक : मा.उषा मुंढे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा.उषा मुंढे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव –

शहरातील महिलांचे जीवन खुप धकाधकीचे, धावपळीचे, ताण-तणावाचे बनत आहे. या डिजिटल युगात महिला स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात व काम आटोपण्याच्या नादात योग्य आहार व व्यायाम करणे केवळ वेळे अभावी पुढे ढकलत राहतात, परिणामी त्यांच्यामध्ये स्थूलपणा वाढून शरीर व्याधी निर्माण होतात, वजन वाढणे, थायरॉईल, चिडचिड असे आजार व विकार त्यांच्या नशिबी येतात. तरी यासाठी महिला बाल कल्याण विभागामार्फत शहरातील महिला वर्गासाठी योग प्रशिक्षण शिबिर राबविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०६/१०/२०१८

सुचक : मा.उषा मुंढे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा.उषा मुंढे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अंध/दिव्यांगासाठी तसेच जेष्ठ नागरिकांसाठी विविध योजना राबविणेत येत आहेत. त्या अंतर्गत अंध/दिव्यांगासाठी तसेच जेष्ठ नागरिकांना PMPML चा वार्षिक मोफत पास देण्याची योजना सद्या कार्यान्वित आहे. तथापी या नागरिकांपैकी ६० वर्षापुढील अंध नागरिकांना त्यांचे वयोमानानुसार व प्रकृतीनुसार त्यांची दैनंदिन कामे करणे, रुग्णालयात उपचार घेणे याकरिता शहरातील विविध ठिकाणी फिरावे लागते परंतु त्यांना हि कामे करणेसाठी एकटयाने फिरणे केवळ अशक्यप्राय असते. अशावेळी या व्यक्तिंबरोबर नेहमी कुटुंबातील एखाद्या व्यक्तिला बरोबर घेवुन जावे लागत असते. यासाठी या कुटूंबाला मोठा आर्थिक ताण सहन करावा लागतो. वास्तवत: शहरामध्ये ६० वर्षापुढील अंध नागरिकांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यामुळे अशा ६० वर्षापुढील अंध नागरिकांच्या कुटूंबातील एका व्यक्तिला PMPML चा वार्षिक मोफत पास दिल्यास त्यांचेवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होणार आहे. हि योजना कार्यान्वित करणेसाठी धोरण ठरविणे आवश्यक असल्याने शहरातील ६० वर्षापुढील अंध नागरिकांच्या कुटूंबातील सोबत असणा-या एका व्यक्तिस योग्य त्या अटी/शर्ती टाकुन PMPML चा वार्षिक मोफत पास देणेबातचे धोरण तयार करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६६८/२०१८
दिनांक : ०८/१०/२०१८



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.